मनोरंजनासह प्रबोधनासाठी...
दैनिक
epaper.rayatsamachar.com
# रयत समाचार
खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी
संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

अंजनीच्या सुता,
तुला रामाचं वरदान,
एकमुखानं बोला,
बोला जय जय हनुमान

चित्रकार
डॉ. राजीव सूर्यवंशी



• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक २८६ वा • शनिवार, ता.१२ एप्रिल २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००

रयत समाचार पोर्टल
Scan QR Code

रयत समाचार चॅनल
Scan QR Code

इंग्रजी रयत समाचार वाचण्यासाठी
Scan QR Code


रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर

## मंगेशकर हॉस्पिटलची ही बाब गंभीर नाही का?- विजय कुंभार

### सवलतीच्या नावाखाली मिळालेल्या मालमत्तेवर चढवला सरकारी बोजा


**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाकडून अवघ्या १ रुपया वार्षिक भाडेपट्ट्यावर लता मंगेशकर फाउंडेशनला मिळालेल्या जमिनीवर सरकारी बोजाही चढवला आहे. सवलतीच्या नावाखाली मिळालेल्या मालमत्तेवर असा सरकारी बोजा चढविणे ही मंगेशकर हॉस्पिटची बाब गंभीर नाही का? असा सवाल माहिती अधिकार कार्यकर्ते विजय कुंभार यांनी विचारला.


सुविधाधिकार:
हक्काचा मूळ धारक: H शेतीकडे
वर्ग:
पट्टेदार:
इतर भार:
इतर शेरे:

| दिनांक | व्यवहार | खंड क्रमांक | नविन धारक(धा), पट्टेदार(प) किंवा भार(इ) |
|---|---|---|---|
| 19/05/2015 | [illegible] | | |
| 15/01/2020 | बोजा नोंद – मा. तहसिलदार पुणे शहर यांचेकडील पत्र जा. क्र. ... ऑडिट/कावि/164/2019 दि. 28/12/2019 ... महालेखापाल नागपूर ... सन 2015-16 ... लता मंगेशकर मेडिकल फाउंडेशन ... दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल ... भू क्र 1409 ... रक्कम रुपये 58,60,000/- ची बोजा नोंद ... | | E महाराष्ट्र शासन |
| 22/02/2021 | [illegible] | | [illegible] |

For View Only-Not for Legal Purpose



अधिक महिती देताना त्यांनी सांगितले, कोणतीही सरकारी रक्कम न भरल्यास, त्या देण्याचा बोजा संबंधित स्थावर मालमत्तेवर नोंदवला जातो. त्यांनी याबाबतचे फेरफार माहितीसाठी दिले आणि ते म्हणाले महालेखापाल नागपूर यांच्या लेखापरीक्षण सन २०१५-१६ मध्ये हा मुद्दा उचलण्यात आला असून, दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल अॅण्ड रिसर्च सेंटर, पेठ एरंडवणे, भू. क्र. १४०८ वरील भूखंडावर ₹५८,६०,०००/- चा बोजा नोंदवला आहे. तहसीलदार, पुणे शहर यांच्या पत्रानुसार (जा. क्र. ऑडिट काली/१६४/२०१९, दिनांक २८/१२/२०१९), ही नोंद अधिकृतपणे करण्यात आली आहे. मंगेशकरांची ही बाब अत्यंत अनैतिक असून शासनासह समाजाची फसवणूक असल्याचे प्रकरण समोर आले आहे.

## शिवद्रोही कोरटकरला कोल्हापूर पोलिसांचा पेशवाई थाटात निरोप

### माध्यमांच्या गाड्या आडवल्या, बंदी असलेल्या काळ्या फिल्मिंगच्या कारचा गैरवापर

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्रासह जगाचे आराध्य दैवत असलेले छत्रपती शिवाजी महाराज, तसेच छत्रपती संभाजी महाराज यांच्यावर गरळ ओकून इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांना जीवे मारण्याची धमकी देऊन फरार झालेला, नंतर पोलिसांना सापडलेला. प्रशांत कोरटकरला पहिल्यांदा पोलीस कोठडीनंतर न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. सर्व सोपस्कार पार पाडल्यानंतर त्याची जामीनावर सुटका करण्यात आली. शिवद्रोही कोरटकर कळंबा जेलमधून सुटताच कोल्हापुरातून व्हाया मुंबई नागपूरला रवाना झाला. मात्र, प्रशांत कोरटकर कोल्हापूर पोलिसांनी दिलेली स्पेशल ट्रीटमेंट शिवप्रेमींमधे चर्चेचा विषय ठरली. गेल्या काही दिवसांपासून शिवद्रोही कोरटकरने केलेल्या वक्तव्यांमुळे खस्या शिवप्रेमींमधे संतापाची लाट पसरली आहे. कोल्हापूरमध्ये त्याला न्यायालयात हजर करताना कोल्हापुरी हिसका दाखविण्याचा प्रयत्न झाला. त्यामुळे कोरटकरच्या सुरक्षेसाठी कोल्हापूर पोलिसांनी कोणतीही कसर ठेवली नव्हती. कोरटकरची सुटका होणार असल्याने कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. मात्र, हे करत असताना कोल्हापूर पोलिसांनी एक प्रकारे पेशवाई थाटामध्येच त्याला निरोप दिल्याचे दिसले. शिवद्रोही आरोपीसाठी प्रसार माध्यमांच्या गाड्याही अडवण्याचे महान कार्य कोल्हापूर पोलिसांनी करून दाखवले. सर्वसामान्यांच्या कार फिल्मिंग सापडल्यास जागेवर पावती मर्दुमकी दाखविली जाते. मात्र कोल्हापुरात राज्याच्या नव्हे, तर देशाच्या आराध्य दैवतावर गरळ ओकणाऱ्या



कोरटकरची सुटका करण्यासाठी काळ्या फिल्मिंग असलेल्या कारचा वापर करण्यात आला. कोरटकरला सोडण्यासाठी कोल्हापूर पोलिसांकडून -०८--६७७६ या फिल्मींग कारचा वापर करण्यात आला. त्यामुळे कोल्हापूरकरांच्या मनामध्ये संतापाची लाट निर्माण झाली. इतकेच नव्हे तर या संपूर्ण प्रकाराविरोधात कोल्हापूर पोलीस अधीक्षक आणि प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्याकडे तक्रार करण्यात आली आहे. प्रजासत्ताक सेवा संस्थेचे दिलीप देसाई यांनी या संदर्भातील नाराजी मेलने व्यक्त करत संबंधित कारचा फोटोही निर्दशनास आणून दिला. त्या एरियामध्ये या वाहनास कोणी परवानगी दिली? असा सवाल कोल्हापूरकर विचारत आहेत. दिलीप देसाई आणि आपल्या तक्रारीमध्ये म्हटले की, चारचाकी वाहनांच्या काचांना फिल्मिंग करणे किंवा काळ्या रंगाच्या काचा वापरण्यास कायद्याने प्रतिबंध आहे, तो गुन्हा आहे. हे माहित असतानाही अशा वाहनांवर कारवाई करण्याचे अधिकार पोलीस प्रशासन व प्रादेशिक परिवहन विभागाला आहेत. तथापि अनेक वाहने अशा प्रकारे काळ्या काचा लावून राजरोसपणे फिरत आहेत. शिवद्रोही प्रशांत कोरटकरची कळंबा कारागृहातून जामीनावर सुटका झाली. यावेळी काळ्या काचा असणारी चारचाकी कळंबा कारागृहामध्ये दिसली आणि त्याच कारमधून आरोपी निघून गेला. ज्या भागांमध्ये बाहेरच्या व्यक्ती, नागरिकांना वाहन नेता येत नाही, त्या एरियामध्ये या वाहनास कोणी परवानगी दिली? अशी विचारणासुद्धा त्यांनी केली. या वाहनाने मोटर वाहन कायद्याच्या तरतुदींचे पालन केले आहे किंवा नाही याची शहानिशा न करता कोणाच्या सांगण्यावरून हे वाहन ते बाहेर सोडण्यात आले, या बाबींची चौकशी जिल्हा पोलीस प्रमुख त्याचप्रमाणे प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी करणे अगत्याचे आहे. पोलीस अधिकाऱ्यांसमोर कायद्याची पायमल्ली करणारे वाहन असूनसुद्धा पोलिसांनी त्यावर कारवाई केली नाही, याची सुद्धा चौकशी होणे आवश्यक असल्याचे त्यांनी आपल्या तक्रारीमध्ये म्हटले आहे.

### रयतमार्मिक




## शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे महत्व कमी लेखू नका- गायकवाड

**संगमनेर । प्रतिनिधी**

येथील ज्येष्ठ परिवर्तनवादी कार्यकर्ते शिवाजीराव गायकवाड यांनी मागणी केली आहे की, संगमनेरात शिवरायांचा भव्य पुतळा उभारला जावा. नवा पुतळा उभा होईपर्यंत या पुतळ्यांचे महत्व कमी होऊ नये, म्हणून महाराजांच्या पुतळ्याच्या मागील भिंतीवर रायगडाचे भव्य होर्डिंग संगमनेर नगरपालिकेने त्वरित लावावे, ही नम्र विनंती ते पुढे म्हणाले, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे फोटो सोशल मीडियात शेअर करत आहे. महाराजांच्या पुतळ्याचे महत्व कमी करून बजरंग दल व विश्व हिंदू परिषदेला अधिक महत्व देण्याचा प्रयत्न मुद्दाम केलेला आहे. बजरंग दलाच्या व विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांना जाब विचारणे आवश्यक आहे. त्यांना मागणी केली की, स्वयंप्रकाशित छत्रपती शिवाजी महाराजांचा संगमनेरात भव्य पुतळा उभा करायलाच हवा. नवा पुतळा उभा होईपर्यंत या पुतळ्यांचे महत्व कमी होऊ नये, म्हणून महाराजांच्या पुतळ्याच्या मागील भिंतीवर रायगडाचे भव्य होर्डिंग संगमनेर नगरपालिकेने त्वरित लावावे.

## ई-मंत्रिमंडळ : कागद विरहित भविष्यासाठी एक पाऊल

### शासन व नागरिक यांच्यातील दुरावा कमी करण्यासाठी पाऊल

**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून व डिजिटल इंडिया अभियानाच्या अनुषंगाने, महाराष्ट्र शासनाने नागरिक सेवा अधिक प्रभावीपणे डिजिटल स्वरूपात पुरवण्याचा संकल्प केला आहे. शासन व नागरिक यांच्यातील दुरावा कमी करून प्रशासन अधिक जवळ आणण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. 'ई-मंत्रिमंडळ' हा उपक्रम महाराष्ट्राच्या ई-गव्हर्नन्स क्षेत्रात पुढे नेत आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कार्यक्षम आणि पारदर्शक प्रशासनाचा पुढचा टप्पा ठरेल, अशी माहिती राज्य शासनामार्फत देण्यात आली आहे. महाराष्ट्राने डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून कागदविरहित (paperless) ई-गव्हर्नन्सच्या दिशेने उल्लेखनीय प्रगती केली आहे. 'ई-ऑफिस', 'सेंट्रल रजिस्ट्री युनिट' (जे मंत्रालयातील सर्व पत्रव्यवहारांचे डिजिटायझेशन करते), 'आपले सरकार' व 'जिल्हास्तरीय सुशासन निर्देशांक (DGGI)' यांसारख्या अनेक ॲप्लिकेशन्स व प्रणालींमुळे ही प्रगती शक्य झाली आहे. याशिवाय, प्रशासन अधिक गतिमान व पारदर्शक करण्यासाठी लिपीक वर्गापासून ते मंत्र्यांपर्यंत ई-ऑफिस प्रणालीचा प्रभावी वापर शासकीय यंत्रणेतील सर्वच स्तरांवर करण्यात येतो आहे.गेल्या चार वर्षांपासून महाराष्ट्र विधानमंडळातील सर्व आमदार व विधानपरिषदेतील सदस्य ( MLAs व MLCs ) सभागृहातील कामकाजासाठी टॅबलेटचा वापर करत आहेत, ज्यामुळे संपूर्ण प्रक्रिया कागदविरहित होत आहे. ई-मंत्रिमंडळ' हा उपक्रम महाराष्ट्राच्या ई-गव्हर्नन्स क्षेत्रात पुढे नेत आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने कार्यक्षम आणि पारदर्शक प्रशासनाचा पुढचा टप्पा ठरेल. या प्रणालीमुळे मंत्रिमंडळ बैठकीचे नियोजन, संदर्भ शोधणे, निर्णयांची अंमलबजावणी व त्या अनुषंगाने कार्यपद्धतींचे परीक्षण अधिक सोप्या पद्धतीने करता येणार आहे. बैठकीदरम्यान ठेवण्यात येणाऱ्या अतिरिक्त विषयांचाही या प्रणालीत समावेश करता येईल. कागदपत्रांच्या वितरणाची घाई न करता, 'ई-मंत्रिमंडळ' प्रणालीमुळे बैठकीचे अजेंडे व संबंधित कागदपत्रे एकाच क्लिकमध्ये मंत्र्यांच्या वर उपलब्ध होतील अगदी वर एखादी फाईल उघडावी तितक्या सहजतेने. 'ई-मंत्रिमंडळ' प्रणाली सुरळीत चालावी यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत विशेष अभियंत्यांची नियुक्ती केली जाणार आहे, जे मंत्र्यांना आवश्यक तांत्रिक मदत करतील. मंत्र्यांना उपलब्ध करून दिलेले हे केवळ 'ई-मंत्रिमंडळ' पुरतेच मर्यादित नसून, ते ई-ऑफिस प्रणालीद्वारे कुठूनही प्रकरणे निर्णित करण्यासाठी, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग बैठकींसाठी, डॅशबोर्डवर योजनांच्या प्रगतीचा मागोवा घेण्यासाठी तसेच , महाराष्ट्र किंवा 'आपले सरकार' यांसारख्या नागरिकाभिमुख ॲप्लिकेशन्सचे परीक्षण करण्यासाठी वापरले जातील. अनेक शासकीय ॲप्लिकेशन्स मोबाईल ॲप्समध्ये रूपांतरित होत असल्यामुळे, ही कार्यालयीन कामासाठी मंत्री महोदयांना अत्यंत उपयुक्त साधन ठरणार आहे. महाराष्ट्र आता उत्तराखंड, उत्तर प्रदेश, अरुणाचल प्रदेश, आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि त्रिपुरा यांच्यानंतर 'ई-कॅबिनेट' प्रणाली लागू करणारे सातवे राज्य होणार आहे. याशिवाय, मध्य प्रदेशसुद्धा या प्रणालीच्या अंमलबजावणीच्या तयारीत आहे.




**महाराष्ट्र राज्यातील अनेक मंत्री अजूनही अधिकृत ईमेल आयडी वापरत नाहीत. मात्र "ई-कॅबिनेट प्रणाली" पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याकरिता मंत्रिपरिषदेतील सर्व सदस्यांसाठी सरकारने ५० ॲपल आयपॅड खरेदी करण्याचा निर्णय घेतलाय! एकूण खर्च: ₹१ कोटी १६ लाख ६५ हजार रुपये. सरकार म्हणतं डिजिटल मंत्रिमंडळ हवंय. हरकत नाही. मंत्रीही लवकरच डिजिटल साक्षर होतील अशी अपेक्षा करूया!" आता तरी सर्व मंत्री अधिकृत ईमेल आयडी वापरतील आणि "स्मार्ट" निर्णय घेतील अशी अपेक्षा करू या!**

**- विजय कुंभार**

## भिकारी मृत्यू प्रकरणी शिवराम ठवरे यांनी नोंदविली राज्य मानवीहक्क आयोगाकडे केस

**शिर्डी । प्रतिनिधी**

येथील भिकारी मृत्यूच्या प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते शिवराम कोंडिबा ठवरे यांच्याकडून राज्य मानवीहक्क आयोगाकडे केलेल्या तक्रार अर्जाच्या आधारे आयोगाकडे केस नोंद करून घेण्यात आली असल्याची माहिती ठवरे यांनी दिली.

अधिक माहिती देताना ठवरे म्हणाले, महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग शिर्डीमध्ये पकडलेल्या भिक्षेकऱ्यांपैकी ४ जणांचा संशयास्पद मृत्यू योग्य चौकशीसाठी विनंती करण्यात आली. शिर्डी (जि. अहिल्यानगर) येथे अलीकडेच मानवाधिकाराच्या दृष्टीने गंभीर घटना घडली आहे. स्थानिक प्रशासनाने व पोलीस यंत्रणेने एक संयुक्त मोहीम राबवून, शहरातील भिक्षावृत्तीवर कारवाई करत तब्बल ५१ भिक्षेकऱ्यांना ताब्यात घेतले होते. या मोहिमेतील कृतीला "भिक्षावृत्ती प्रतिबंध" या उद्देशाने वैधता दिली जात असली, तरी त्या अनुषंगाने पुढे जे घडले ते अत्यंत भयावह व मानवतेला कलंकित करणारे आहे. पुढे ठवरे म्हणाले, ताब्यात घेतलेल्या भिक्षेकऱ्यांपैकी ४ जणांचा मृत्यू झाला आहे. हे मृत्यू संशयास्पद परिस्थितीत झाले असून, ही घटना अत्यंत गांभीर्याने घेण्याची आवश्यकता आहे. काही सामाजिक कार्यकर्ते आणि माध्यम प्रतिनिधींनी यावर प्रश्न उपस्थित केले असून, काहींच्या मते हे मृत्यू अमानुष वागणूक, कुपोषण अथवा वैद्यकीय दुर्लक्षामुळे झाले असण्याची शक्यता आहे. ही बाब केवळ कायदेशीरच नव्हे तर नैतिक व मानवाधिकारांच्या दृष्टीनेही गंभीर आहे. ठवरे यांनी आयोगाकडे मागण्या तेल्या की, या घटनेची निष्पक्ष व स्वतंत्र चौकशी करण्यात यावी. मृत्यू पावलेल्या भिक्षेकऱ्यांच्या शवविच्छेदन अहवालाची माहिती सार्वजनिक केली जावी. ताब्यात घेतलेल्या उर्वरित भिक्षेकऱ्यांना मानवी हक्कांची पूर्ण पूर्तता मिळते आहे का, याची खातरजमा करावी. दोषी ठरणाऱ्या व्यक्तींवर कायदेशीर कारवाई केली जावी. भविष्यात अशा मोहिमा राबवताना मानवी हक्कांचे संरक्षण करणारे धोरणात्मक मार्गदर्शक तत्त्वे तयार करावीत. ते म्हणाले, शिर्डीसारख्या पवित्र ठिकाणी अशा घटनांचा उगम होणे हे दुर्दैवी आहे. यामुळे राज्य व देशाची प्रतिमा मलीन होण्याची शक्यता असून, त्वरित कृती करणे आवश्यक आहे. मानवी हक्क आयोगाने तत्काळ लक्ष घालून कार्यवाही करावी, असे शिवराम ठवरे म्हणाले.



## नाठाळ ट्रम्पला नामिबियाचा दणका!

### अमेरिकन नागरिकांना देश सोडण्याचे आदेश



**गोवा । प्रभाकर ढगे**

नामिबियाचे नवे अध्यक्ष डॉ. नेतुम्बो नंदी-नदैतवाह यांनी अमेरिकेचे नाठाळ राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्पविरोधात जशासतशी भूमिका घेतली आहे. त्यांनी जाहीर केले आहे की, नामिबियामध्ये प्रवेश करणाऱ्या अमेरिकन नागरिकांना यापुढे व्हिसा आवश्यक असेल. पूर्णतः मंजूर व्हिसाशिवाय पकडलेल्या कोणत्याही अमेरिकन नागरिकाला बेकायदेशीर विदेशी घोषित केले जाईल. डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेत आफ्रिकन स्थलांतरितांशी ज्याप्रमाणे वागतात त्याचप्रमाणे वागणूक दिली जाईल.नामिबियामध्ये व्हिसाशिवाय हिरे, सोने, युरेनियम, तांबे आणि इतर खनिजे खाणकाम करणारे ५०० हून अधिक अमेरिकन नागरिक आहेत. त्यांना १ एप्रिलपासून देश सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अन्यथा सक्तीने देशाबाहेर काढण्याचा सज्जड दमही देण्यात आला आहे. जगातील आघाडीच्या हिरे उत्पादकांपैकी एक असलेल्या नामिबियाने आता त्यांच्या हिऱ्यांच्या खाणींवर पूर्ण नियंत्रण मिळवले आहे. ! ही हिंमत आमच्याकडे कधी येणार ?



# औद्योगिकक्षेत्रात एचआर म्हणून प्रशिक्षित समाजकार्यकर्त्यांना प्राध्यान्य- डॉ.सुरेश पठारे

## सीएसआरडी संस्थेमध्ये एचआर मीट २०२५ उत्साहात संपन्न

**अहमदनगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर येथील भा. पा. हिवाळे शिक्षण संस्थेचे सीएसआरडी समाजकार्य व संशोधन संस्थेच्या या संस्थेत एचआर मीट २०२५ हा कार्यक्रम सीएसआरडी पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन मानवी संसाधन व्यवस्थापन विभागातील विद्यार्थ्यांच्या पुढाकारातून करण्यात आले होते. सीएसआरडीचे संचालक डॉ. सुरेश पठारे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमास नगर, सुपा व रांजणगाव येथील औद्योगिक वसाहतीतील नामवंत कंपन्यांतील एचआर अधिकारी आणि प्रतिनिधींनी सहभाग घेतला. यामध्ये प्रामुख्याने धनंजय कुलकर्णी, निरंजन कुलकर्णी, सचिन चंगेडिया, कडुबल भाकरे, पूजा गायकवाड, साजल ओस्तवाल, शेखर कोळूपकर, किरण बहवे, समाधान शिंदे, इव्हान अरोन्हा, पी. सी. बेदोरकर, रामप्रसाद यांच्यासह सीएसआरडीचे प्राध्यापक आसावरी झपके, डॉ. सुरेश मुगुटमल, डॉ. जयमोन वर्गीस, डॉ. प्रदीप जारे, डॉ. विजय संसारे, वैशाली पठारे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात एमएसडब्ल्यूच्या विद्यार्थ्यांनी आपल्या क्षेत्रीय अनुभवांचे सादरीकरण करून केली. त्यांनी उद्योग क्षेत्रात प्रशिक्षण घेताना आलेले अनुभव, शिक्षण



आणि व्यक्तिमत्व विकासावरील प्रभाव याविषयी आपले विचार मांडले. यानंतर स्नायडर इलेक्ट्रिकल येथील वरिष्ठ एचआर अधिकारी धनंजय कुलकर्णी यांनी विविधता, समता, आणि समावेशकता यावरती मार्गदर्शनपर व्याख्यान दिले. त्यांनी कामाच्या ठिकाणी असणारे लिंगभाव, महिलांना उपलब्ध असणाऱ्या संधी, कार्यस्थळी विविधतेचे महत्त्व आणि कामाच्या ठिकाणावरील धोरणांवर सखोल विचार मांडले. त्याच बरोबर त्यांनी त्यांच्या कंपनीतील विविध उपक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. त्यांचे सत्र अत्यंत प्रेरणादायी आणि ज्ञानवर्धक ठरले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सुरेश पठारे यांनी आपल्या भाषणात उपस्थित मान्यवरांचे आभार मानले तसेच विद्यार्थ्यांच्या करिअरच्या दृष्टिकोनातून अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. आजच्या औद्योगिक युगात मानवी संसाधन व्यवस्थापन हे उद्योगधंद्यांचे महत्त्वाचे अंग बनले असून, प्रशिक्षित समाजकार्यकर्त्यांसाठी या क्षेत्रात करिअरच्या अमर्याद संधी उपलब्ध आहेत. मूल्याधिष्ठित नेतृत्व, सकारात्मक मानसिकता आणि कामगारांशी सहानुभूतीपूर्वक संवाद साधण्याची कला या गुणांमुळे समाजकार्याचे विद्यार्थी ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट, ट्रेनिंग अँड डेव्हलपमेंट, एम्प्लॉई एंगेजमेंट, कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) आणि वेल्फेअर ऑफिसर अशा विविध क्षेत्रात आपले बहुमोल योगदान देत आहेत. डॉ. पठारे यांनी उपस्थित पाहुण्यांना विद्यार्थ्यांच्या कौशल्यवृद्धीसाठी सूचना आणि अभिप्राय देण्याचे आवाहन केले. डॉ. पठारे यांनी संस्थेच्या वतीने उद्योगक्षेत्रातील प्रतिनिधींना सहकार्य आणि संवादाच्या आणखी संधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. विद्यार्थ्यांनीही बदलत्या औद्योगिक गरजांना अनुरूप आपले कौशल्य विकसित करावे, असे आवाहन त्यांनी केले. निरंजन कुलकर्णी यांनी कार्यक्रमाबाबत सकारात्मक अभिप्राय देत विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि भविष्यातील करिअरसाठी एआयचे महत्व यावरती मार्गदर्शन दिले. कार्यक्रमाचा समारोप एमएसडब्ल्यूच्या विद्यार्थ्यांनी दिलेल्या औपचारिक धन्यवाद प्रस्तावाने झाला. एचआर मीट २०२५ ने विद्यार्थ्यांना उद्योगजगतातील वास्तवाची ओळख करून दिली, तसेच शैक्षणिक आणि औद्योगिक क्षेत्रातील सशक्त संवादास चालना दिली. हा उपक्रम सीएसआरडी–आयएसडब्ल्यूआर संस्थेच्या ज्ञानकेंद्रिततेची आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने घेतलेल्या प्रयत्नांची साक्ष देणारा ठरला.




# डॉ.पाउलबुधे फार्मसीचा राष्ट्रीय सेवा योजना कॅम्प समारोप

**अहमदनगर । विजय मते**

अहिल्यानगर येथील वसंत टेकडी जवळील डॉ. ना.ज.पाऊलबुधे कॉलेज ऑफ फार्मसी चा नारायणडोह येथे राष्ट्रीय सेवा योजना कॅम्प संपन्न झाला. ३ दिवस सुरू असलेल्या या कॅम्प मार्फत फार्मसी विद्यार्थ्यांनी प्राथमिक शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करून त्या वृक्षांचे संवर्धन करण्याची जबाबदारी घेतली. यावेळी शिक्षक,विद्यार्थी, गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या तीन दिवसीय उपक्रमात विविध कार्यक्रम राबविण्यात आले.या उपक्रमात झाडे लावा, झाडे जगवा, स्वच्छता अभियान राबवून स्वच्छतेचे महत्व गावकऱ्यांना पटवून दिले फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी गावकऱ्यांची प्राथमिक आरोग्य तपासणी करून आरोग्य विषयक जनजागृती करून योग्य ते मार्गदर्शन केले. नारायण डोह येथील प्राथमिक शाळेतील मुलांची आरोग्य तपासणी करून त्यांना खाऊ वाटप करण्यात आला.

या सर्व कार्यक्रमास गावकऱ्यांकडून भरभरून प्रतिसाद मिळाला डॉ.रोशनी सुर्यवंशी यांनी या राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्व सांगितले. याप्रसंगी सरपंच श्रध्दा गुंड, उपसरपंच ग्रा.पं.सदस्य, ग्रामस्थ, डी फार्मसी च्या प्राचार्य अनुराधा चव्हाण, पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य बाळासाहेब बोर्डे,कोऑर्डिनेटर प्राध्यापक काजल जोंधळे, पल्लवी अडागळे, प्रियंका कर्डिले उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष विनय पाऊलबुद्धे यांनी या अभियानाचे विशेष कौतुक करत सर्वांना प्रोत्साहन देत असेच उपक्रम राबविण्यास सांगितले. संस्थेचे डायरेक्टर साई पाऊलबुद्धे,उपाध्यक्ष रामभाऊ बुचकुल,रामकिसन देशमुख, दादासाहेब भोईटे, बीएडच्या प्राचार्य डॉ. रेखाराणी खुराणा, रघुनाथ कारमपुरी, बी फार्मसी चे प्राचार्य डॉ.श्याम पंगा आदींनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कौतुक केले.

# मी सावित्रीबाई ज्योतिराव फुले एकपात्री नाट्यप्रयोगाचे १३ एप्रिलला आयोजन

**अहमदनगर । प्रतिनिधी**

सरकारी शाळा वाचवा आणि मोफत शिक्षण न्याय व हक्क परिषद अभियान, अहिल्यानगर यांच्यावतीने महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून रविवार ता.१३ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ५.३० वाजता माऊली सभागृह, झोपडी कॅन्टीन जवळ, अहिल्यानगर येथे देशभर गाजलेल्या मी सावित्री ज्योतिराव फुले एकपात्री नाट्य प्रयोग आयोजित करण्यात आल्याची माहिती सरकारी शाळा वाचवा आणि मोफत शिक्षण न्याय व हक्क परिषदेचे मुख्य संयोजक सुदाम लगड यांनी दिली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रेहमत सुलतान फौंडेशन, अहिल्यानगर चे अध्यक्ष युनूसभाई तांबटकर हे असणार आहेत. या कार्यक्रमाचे उद्घाटन विनयकराज फौंडेशनचे अध्यक्ष युवा उद्योजक, विपुल वाखुरे यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती भिंगार अर्बन को ऑफ बँक चे संचालक व युवा उदयोजक महेश झोडगे, सातारा रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे, मार्कंडेय विद्यालयाचे माजी प्राचार्य रावसाहेब क्षेत्रे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या एकपात्री नाट्यप्रयोगास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन सरकारी शाळा वाचवा आणि मोफत शिक्षण न्याय व हक्क परिषद अभियान अहिल्यानगर यांच्या वतीने करण्यात आले.

# रक्तदान समाजासाठी सेवाभाव जपण्याचा प्रभावी मार्ग- डॉ.पठारे

## सीएसआरडीच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत रक्तदान शिबीर यशस्वी

**अहमदनगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर येथील भा.पा. हिवाळे शिक्षण संस्थेचे सीएसआरडी समाजकार्य व संशोधन संस्थेच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेले रक्तदान शिबीर उत्साहात व यशस्वीपणे पार पडले. सामाजिक बांधिलकी आणि मानवतेचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात सीएसआरडीच्या विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या शिबिराचे उद्घाटन संस्थेचे संचालक डॉ. सुरेश पठारे यांच्या यांच्या हस्ते झाले. डॉ. पठारे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, रक्तदान ही सर्वश्रेष्ठ मानवसेवा आहे. रक्तदानामुळे अनेकांचे प्राण



वाचवू शकते. युवकांनी समाजासाठी योगदान देण्याचा हा एक प्रभावी मार्ग आहे. त्यांनी विद्यार्थ्यांना नियमितपणे रक्तदान करण्याचे आवाहन करत, अशा सामाजिक उपक्रमांमधून सामाजिक जाणीव आणि उत्तरदायित्व वाढते, असेही सांगितले. समाजकार्याचे शिक्षण घेणारे विध्यार्थी नेहमीच आप आपल्या क्षेत्रकार्यात रक्तदान शिबिरे आयोजित करत असतात त्यामुळे या शिबिरामुळे विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली असे त्यांनी आवर्जून सांगितले. या प्रसंगी एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदीप जारे, डॉ. सुरेश मुगुटमल, डॉ. जयमोन वर्गीस, डॉ. विजय संसारे, आसावरी झपके, वैशाली पठारे, सॅम्युअल वाघमारे, सायली तोरणे यांची उपस्थिती होती. शिबिरासाठी डॉ. विखे पाटील मेमोरिअल हॉस्पिटल ब्लड बँकेचे सहकार्य लाभले. त्यांच्या टीममध्ये डॉ. मानसी चव्हाण, डॉ. प्रिती, डॉ. आयुष श्रीखंडे, समन्वयक गौतम सगळगिळे, टेक्निशियन मोनिका गोयकर, स्टाफ नर्स विजया बागल, सहायक भिमराव वाघमारे, व रोहित जाधव यांचा समावेश होता. एनएसएस स्वयंसेवकांनी संपूर्ण शिबिराच्या यशस्वी आयोजनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने रक्तदान करत समाजसेवेचा आदर्श घालून दिला. शिबिरामध्ये रक्तदात्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. संस्थेच्या वतीने सर्व विद्यार्थी रक्तदात्यांचे, डॉक्टरांचे व सहकार्य करणाऱ्या टीमचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकीची भावना अधिक दृढ झाली असून, भविष्यातही असे उपक्रम क्षेत्रकार्याच्या ठिकाणी राबवण्याचा निर्धार विद्यार्थ्यांनी व्यक्त केला.


# नागापूर–बोल्हेगाव उपनगरात अवैध धंद्यांचा सुळसुळाट; प्रशासनाचे दूर्लक्ष

## महिला, विद्यार्थीनी संबंधी दूर्घटना घडल्यास जबाबदारी कोणाची?

**अहमदनगर । प्रतिनिधी**

शहरातील नागापूर बोल्हेगाव उपनगर झपाट्याने विकसित होत आहे. या ठिकाणची लोकसंख्या जशी झपाट्याने वाढली तसेच अवैध धंद्यांचा सुळसूळाट झाला. यास प्रशासनाचा आशिर्वाद असल्याने सामान्य नागरिक, महिला, मुली जीव मुठीत धरून रस्त्याने जात असल्याचे चित्र दिसते.

या परिसरात शाळा, महाविद्यालय, नर्सिंग कॉलेजसह होमिओपॅथिक महाविद्यालय असल्याने बाहेरगावच्या ग्रामीण भागातील शेतकरी व गरीबांच्या मुली होस्टेलला रहातात. त्यामुळे त्यांच्या सुरक्षिततेचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. गांधीनगर पासून ते आंबेडकर चौक ते मनमाड रस्त्यापर्यंत देशी, गावठी दारू सर्रास विकली जाते? त्यासोबतच बिंगो, मटका, मावा टपऱ्या पोलिसांच्या नाकावर टिच्चून चालू आहेत. हे सर्व चालू असल्याचे पोलिस प्रशासनाला माहिती नाही हे म्हणणे धाडसाचे ठरणार आहे. एमआयडीसी–तोफखाना पोलीस स्टेशनच्या हद्दीत हा येतो. या ठिकाणावरून निंबळक, बोल्हेगाव, गांधीनगर, राजे संभाजी नगर, विशाल हनुमान नगर, शिवाजीनगर आखाडा, कळमकर नगर, नवनाथ नगरसह अनेक निवासी वसाहतीतील महिला मुली येतजात असतात. याच रस्त्यावरच पुढे एमआयडीसी, काकासाहेब म्हस्के शैक्षणिक संकुल, सनफार्मा शाळा महाविद्यालय, रामराव चव्हाण विद्यालय असल्याने या रस्त्याला मोठ्या प्रमाणात विद्यार्थीनी, औद्योगिक वसाहतीत कामासाठी जाणाऱ्या महिला, शाळेतील मुलींची ये जा असते, परंतु रस्त्यालगत असणाऱ्या अवैध धंद्यांमुळे येणाऱ्या जाणाऱ्या महिलांची, मुलींची छेड काढण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात होतात. मागील पंधरा दिवसपूर्वी अतिक्रमण



विभागाने या रस्त्यावरचे अतिक्रमण काढले होते.

अतिक्रमण विभागाची कारवाई झाल्यानंतर अवैध धंद्याना आळा बसेल असे वाटत असतानाच कारवाई झाल्यानंतर दोन दिवसातच परत रस्त्याच्या बाजूला अवैध धंदे चालू करण्यात आले. त्यामुळे कारवाईचा हा फार्स कशासाठी? अशी परिसरातील नागरिकांमध्ये चर्चा होती. अवैध धंदे पोलिस प्रशासन, अन्न व औषध प्रशासन यांच्या आशीर्वादानेच चालू आहेत ! यावर लवकरात लवकर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी परिसरातील महिला विद्यार्थीमधून होत आहे.


## रयत समाचार Classified छोटी जाहिरात

### छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

**भाड्याने देणे**
परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.
– संपर्क –
८८८८३४७४११

**निसार Art**
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.



**मे. रुपाली एजन्सी**
फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स
राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर – ४१४००१.
(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०
ई–मेल – rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
**जगदंबा टी सेंटर**
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद–विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# महापुरुषांचा सकारात्मक दृष्टीकोन आचरणात आणणे ही खरी क्रांती- प्राचार्य डॉ. कदम

## कृषि विद्यापीठात महात्मा फुले यांची १९८ वी जयंती साजरी




**राहुरी । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना बी बियाणे, अवजारे दिली पाहिजेत. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळाला पाहिजे, शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली पाहिजे असे म्हणणारे पहिले समाजसुधारक म्हणजे क्रांतीसुर्य महात्मा जोतिबा फुले हे होते. सर्वांना शिक्षणाची गरज आहे असे म्हणणारे व त्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य पणाला लावणारे थोर समाजसुधारक होते.

क्रांती ही कृतीने होत असते हा दृष्टीकोन देणारे ते पहिले तत्त्वज्ञ होते. यासारख्या महापुरुषांचा सकारात्मक दृष्टीकोन आपल्या आचरणात आणणे ही खरी क्रांती होय असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक व प्रसिद्ध व्याख्याते प्राचार्य डॉ. प्रदीप कदम यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे कुलगुरु डॉ. शरद गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. नानासाहेब पवार सभागृहात महात्मा जोतिबा फुले यांची १९८ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. प्रदीप कदम बोलत होते. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे होते. यावेळी कुलसचिव डॉ. नितीन दानवले, कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. कैलास कांबळे, संचालक, राष्ट्रीय सेवा योजना तथा विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. महावीरसिंग चौहान व क्रीडा अधिकारी डॉ. विलास आवारी उपस्थित होते.

यावेळी डॉ. प्रदीप कदम आपल्या मार्गदर्शनात पुढे म्हणाले की महात्मा फुलेंना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर गुरुस्थानी मानत होते. सार्वजनिक सत्यधर्माची संकल्पना त्यांनी मांडली. पुण्याचे आयुक्त म्हणून काम करतांना त्यांनी पुण्यातील सर्व पेठांमध्ये शाळा सुरू केल्या. सर्व पेठांमध्ये बंद नळाद्वारे पाणीपुरवठा योजना राबवली कारण पाणी दूषित होता कामा नये. सर्व रस्ते हे रुंद बनविण्याची योजना आखली व त्या रस्त्याच्या कडेला झाडे लावली. ते उद्योजक होते तसेच राष्ट्र उभारणी करणारे बिल्डरही होते. डॉ. साताप्पा खरबडे आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात म्हणाले की महात्मा फुलेंनी भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली. त्याद्वारे त्यांनी संपूर्ण देशाला शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांना त्यांनी वाचा फोडली. सत्यशोधक समाजाची निर्मिती केली. समाजातील विषमता दूर करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. स्वातंत्र्य, समता व बंधुत्व याद्वारे राष्ट्र उभारणीचे मोठे कार्य केले. अशा या महामानवाचे विचार आपण आचरणात आणले पाहिजेत असे यावेळी डॉ. खरबडे म्हणाले.

या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. महाविरसिंग चौहान यांनी केले. डॉ. कैलास कांबळे यांनी कवितेद्वारे आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसाद उबाळे यांनी तर आभार डॉ. विलास आवारी यांनी मानले. या कार्यक्रमासाठी विद्यापीठातील विभाग प्रमुख, अधिकारी, कर्मचारी तसेच पदव्युत्तर महाविद्यालय, सावित्रीबाई फुले प्राथमिक विद्यालयाचे विद्यार्थी व विद्यार्थींनी उपस्थित होते.



# महात्मा फुले पुतळा उभारण्याची राष्ट्रवादी काँग्रेसची मागणी

**कोपरगाव । किसन पवार**

कोपरगाव शहरात छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, लोकमान्य टिळक, राष्ट्रपिता महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे आदी थोर राष्ट्रपुरुषांचे पुतळे अभिमानाने उभे असून, समाजाला व भावी पिढ्यांना प्रेरणा देत आहेत. त्याचप्रमाणे थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांचा पुतळाही कोपरगाव शहरात उभारण्यात यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार गट) नेते ॲड. संदीप वर्पे यांनी केली. महात्मा फुले जयंतीनिमित्त कोपरगाव माळी बोर्डिंग येथे आयोजित कार्यक्रमात महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

या वेळी ॲड. वर्पे बोलत होते. त्यांनी पुढे सांगितले की, ''महात्मा फुले यांनी शिक्षण, स्त्री-मुक्ती, समता व सामाजिक न्यायासाठी आयुष्य वाहिले. त्यांच्या स्मृती जपण्यासाठी आणि नवीन पिढीला प्रेरणा देण्यासाठी त्यांच्या पुतळ्याची गरज आहे. यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन शासन व नगरपालिका प्रशासनाकडे अधिकृतरीत्या मागणी करावी.'' या कार्यक्रमाला कोपरगावचे माजी नगराध्यक्ष पदमाकांत कुदळे, ज्योती नागरी पतसंस्थेचे चेअरमन रविंद्र बोरावके, अनिल पांढरे, प्रदीप नवले, वैभव गिरमे, वीरेन बोरावके, दिलीप गिरमे, राजेंद्र गिरमे, गौतम टिळेकर, किरण बोरावके, सतीश भुजबळ, रवी चौधरी, बंडू राऊत व असंख्य माळी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनीही पुतळा उभारणीच्या प्रस्तावाचे समर्थन करत महात्मा फुले यांचे कार्य व विचार पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याची गरज अधोरेखित केली.

# फुले यांनी शिक्षणाची क्रांतीज्योत पेटवली- तन्मय पुंड

## समता परिषदेच्या वतीने फुले जयंती साजरी: पाणी बचत व पर्यावरण संवर्धनाचा संदेश



**नगर तालुका । प्रतिनिधी**

तालुक्यातील नेप्ती येथील संत सावता महाराज मंदिरात अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद, सकाल माळी समाज ट्रस्ट ,सावता महाराज तरुण मंडळ व ग्रामस्थाच्यावतीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी पाणी बचतीचा व पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. सामाजिक कार्यकर्ते , सीए तन्मय पुंड यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी समता परिषदेचे तालुका अध्यक्ष रामदास फुले ,शाखा अध्यक्ष शाहू होले , माजी सरपंच अंबादास पुंड, संजय जपकर, दिलीप होळकर, देवा होले, तन्मय पुंड, शिवाजी होळकर, उपसरपंच जालिंदर शिंदे, प्रा. एकनाथ होले, प्रा. भाऊसाहेब पुंड, भानुदास फुले, युवा कीर्तनकार आकाश महाराज फुले, ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ पुंड, संतोष चौरे, सुरेश कदम, रवी पुंड, बाळासाहेब बेल्हेकर, संभाजी होले, दगडू होळकर,सचिन पुंड, सुभाष नेमाने, बाजीराव वाघाडे, अनिल पंडित, नानाभाऊ इंगोले, कुमार जपकर, आदित्य पुंड , राज बेल्हेकर, कृष्णा शेरकर, आयुष राऊत , सौरभ भुजबळ व परिसरातील समता सैनिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. भारत देशात महात्मा फुले यांनी शिक्षणाचा प्रचार केला.

माळी समाज हा महात्मा फुले ,सावित्रीबाई फुले व सावता महाराज यांच्या विचारावर चालणारा समाज आहे .महात्मा फुले यांनी शिक्षणाची ज्योत पेटवली त्यामुळे मी सीए झालो.अंधारलेल्या समाजाला ज्ञानाचा प्रकाश देऊन महात्मा फुले यांनी शैक्षणिक क्रांती केली छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी शोधून त्यांच्या समतेच्या विचाराचा जागर त्यांनी केला. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्यामुळेच महिलांना शिक्षणाची दारे उघडी झाली.

त्यांच्यामुळेच महिला डॉक्टर , वकील, राष्ट्रपती झाल्या. त्यामुळे भारत देशात महात्मा फुले यांनी शिक्षणाची क्रांतीज्योत पेटवली असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते, सीए तन्मय पुंड यांनी केले. महात्मा फुले यांनी समाजाला खरी दिशा दिली .त्यांनी तळागाळातील समाजापर्यंत शिक्षण देण्याचे महान कार्य केले त्यामुळे महात्मा फुले यांचे कार्य विसरू नका असे प्रतिपादन समता परिषदेचे तालुकाप्रमुख रामदास फुले यांनी केले.



# जवाहर विद्यालयात महात्मा फुले यांना अभिवादन

**नेवासा । रावसाहेब राशिनकर**

येथील जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चांदा येथे स्त्री शिक्षणाचे प्रणेते,क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांना १९७ व्या जयंतीनिमित्त विद्यालयाचे प्राचार्य हरीभाऊ जावळे यांच्या शुभहस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य रघुनाथ भोजने,पर्यवेक्षक अविनाश रामफळे, प्रसिध्दी विभाग प्रमुख प्रा. रावसाहेब राशिनकर, ज्येष्ठ शिक्षक राजेश शेंडगे, संजय ढेरे, जे.एस.शेटे, शेख एस.एम., अनंत शेळके, कलाशिक्षक स्वप्नील मालवंडे, ग्रंथपाल सी.एन.घुगरकर, ज्येष्ठ शिक्षिका शरयू मरडे, सांस्कृतिक विभागाच्या स्वाती दळवी,रुख्मिणी सोनवणे, अश्विनी दहातोंडे, भावना कांबळे, प्रा.सोनू फुंदे,प्रा.वैशाली ठोंबरे- येळवंडे , शिक्षकेतर कर्मचारी कांबळे व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# सद्भावना आनंद सेवा मंडळाची अनोख्या उपक्रमाने महावीर जयंती साजरी



**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

भगवान महावीरांचे चरित्र अहिंसा, सत्य,अपरिग्रह ब्रह्मचर्य व तप या सिद्धांतावर आधारित आहे. भगवान महावीरांनी त्यांच्या जीवनात व त्यांच्या आचरणातून जे काही सांगितले आहे. त्याच पदचिन्हावर जैन समाज मार्गक्रमण करीत आहे. भगवान महावीर यांचा बोध घेऊन श्रीगोंदा शहरालगत असलेल्या वनविभागाची जंगलात असलेल्या वन्यप्राणी पक्षी यांची पाण्यासाठी होणारी वणवण व गैरसोय लक्षात घेऊन महावीर जयंती विविध कार्यक्रमांनी साजरी होत असताना श्रीगोंदा शहरातील रविवार पेठ येथील सद्भावना आनंद सेवा मंडळाने ता. १० एप्रिल २०२५ रोजी भगवान महावीर यांच्या जयंतीचे औचित्य साधून जंगलात असलेल्या पाणवठ्यावर टँकरद्वारे पाणी सोडुन जंगलातील पशुपक्षी व वन्यप्राण्यांच्या पिण्याच्या पाण्याची सोय करुन महावीर जयंती अनोख्या पद्धतीने साजरी केली. तसेच दरवर्षी उन्हाळ्यात होणाऱ्या पशुपक्षी प्राण्यांच्या पाण्याची गैरसोय टाळण्यासाठी दरवर्षी महावीर जयंतीनिमित्त जंगलात असलेल्या पाणवठे टँकरद्वारे भरुन पशुपक्षी प्राण्यांच्या पाण्याची गैरसोय टाळण्याचा अनोखा उपक्रम हाती घेतल्याने सद्भावना आनंद सेवा मंडळाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# लक्षवेध प्रज्ञाशोध परीक्षेत गौरी शिंदेचे यश

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

राज्यस्तरीय लक्षवेध प्रज्ञाशोध दादा वामन जोशी प्राथमिक विद्यालयाच्या इयत्ता तिसरीतील गौरी योगेश शिंदे या विद्यार्थिनीने १५० पैकी १३२ गुण मिळवून केंद्रात द्वितीय, जिल्ह्यात पाचवा व राज्यात दहावा क्रमांक मिळवत घवघवीत यश संपादन केले. त्याचप्रमाणे गौरीने भारत टॅलेंट ऑलम्पियाड परीक्षेत केंद्रात द्वितीय क्रमांक मिळविला. गौरी शिंदेच्या या यशाबद्दल मुख्याध्यापक सचिन मुळे, वर्गशिक्षिका प्रीती भणगे, आजोबा अशोक शिंदे, वडील योगेश शिंदे, पत्रकार संदीप पाळंदे यांनी अभिनंदन केले.



# समाजातील गरजूंसाठी फिनिक्सचे समर्पित कार्य- महंत संगमनाथ

## ३४० रुग्णांची नेत्र तपासणी; ७८ रुग्णांवर होणार शस्त्रक्रिया

**नगर तालुका । प्रतिनिधी**

नेत्रदान व अवयवदान चळवळ गतीमान होण्यासाठी फिनिक्सचे योगदान सुरु आहे. महापुरुषांनी तत्कालीन सामाजिक प्रश्न व वंचित घटकांसाठी कार्य केले. त्यांचा आदर्श ठेऊन काळाची गरज बनलेल्या आरोग्य प्रश्नावर फिनिक्सचे कार्य दिशादर्शक असून, समाजातील गरजूंसाठी फिनिक्सचे समर्पित कार्य सुरु असल्याचे प्रतिपादन श्री विशाल गणपती देवस्थानचे महंत संगमनाथ महाराज यांनी केले. फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने महात्मा फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव सप्ताहानिमित्त नागरदेवळे येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी संगमनाथ महाराज बोलत होते. महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन शिबिराला प्रारंभ करण्यात आले. यावेळी फिनिक्स फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे, महात्मा फुले पतसंस्थेचे शरद झोडगे, उद्योजक अण्णा चौधरी, रतन तुपविहिरे, गणेश राऊत, लवेश गोंधळे, ज्येष्ठ नागरिक संघाचे भिंगारदिवे आदी उपस्थित होते.





## महात्मा फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाचा उपक्रम

शरद झोडगे म्हणाले की, फिनिक्सच्या माध्यमातून अनेक दृष्टीहीन व्यक्तींना नवदृष्टी मिळाली आहे. अंधकारमय जीवन बनलेल्या सर्वसामान्यांच्या जीवनात प्रकाश निर्माण करण्याचे कार्य फिनिक्स फाऊंडेशन करत असल्याचे त्यांनी सांगितले. जालिंदर बोरुडे म्हणाले की, फिनिक्स फाऊंडेशनने अनेकांचे मरणोत्तर नेत्रदान घडवून आनले असून, एका व्यक्तीच्या नेत्रदानाने दोन अंध व्यक्तींच्या जीवनात प्रकाश निर्माण होतो. डोळे कृत्रिमरित्या तयार होत नसून, मरणोत्तर नेत्रदान झाल्यानेच अंधाचे जीवन प्रकाशमान होणार असल्याचे सांगून त्यांनी महापुरुषांच्या विचाराने फिनिक्सच्या माध्यमातून कार्य सुरु असल्याचे सांगितले. नागरदेवळे येथील संत सावता महाराज मंदिरात तज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीमध्ये ३४० रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. ७८ रुग्णांवर पुणे येथील के.के. आय बुधराणी हॉस्पिटल मध्ये मोतीबिंदू, काचबिंदूची मोफत शस्त्रक्रिया केली जाणार आहे. यावेळी शिबिरातील गरजूंना अल्पदरात चष्मे वाटप करण्यात आले. शिबिर यशस्वी करण्यासाठी गौरव बोरुडे, सागर खरपुडे, मंगेश दरवडे, सौरभ बोरुडे, अभी रासकर, राजेंद्र बोरुडे, ओम बोरुडे यांनी परिश्रम घेतले.

# महिला उध्दारकर्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर

सोमवार १४ एप्रिल रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वि जयंती आहे. १४ एप्रिल १८९१ साली डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा मध्यप्रदेशातील महू या गावी जन्म झाला. डॉ बाबासाहेब आंबेडकरांना १३४ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन! डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी उभे आयुष्य दिन दलित, उपेक्षित, वंचित वर्गासाठी घालवले. या वर्गासाठी बाबासाहेबांनी जे कार्य केले ते तर सर्वानाच माहीत आहे पण डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी महिला वर्गासाठी जे कार्य केले ते खूप कमी लोकांना माहीत आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने महिलांचे उध्दारकर्ते आहेत पण दुर्दैवाने आजही देशातील अनेक महिलांना हे माहीतही नाही. बाबासाहेबांनी महिलांसाठी जे कार्य केले ते याआधी कोणीही करू शकले नाही. आपल्या पुरुष प्रधान संस्कृतीत स्त्रिया या गुलामच होत्या. स्त्रियांना गुलमाचीच वागणूक मिळत होती. अगदी उच्चवर्णीय स्त्रिया देखील गुलामीचेच जीवन जगत होत्या. डॉ बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्यांनंतर स्त्रियांनाच उपेक्षित मानत होते. मातोश्री रमाबाईला लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात महिलांच्या उन्नती व मुक्तीसाठी लढणारा मी योद्धा आहे. महिलांना या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी मी शेवटच्या क्षणापर्यंत लढेल. बाबासाहेबांनी त्यांचे बोल खरे करून दाखवले ते राज्यघटनेच्या माध्यमातून. बाबासाहेबांनी राज्यघटनेच्या माध्यमातून महिलांना इतके अधिकार दिले की जे त्यांना हजारो वर्ष आणि ३३ कोटी देवताही देऊ शकले शकले नाही. पुरुषप्रधान संस्कृती आणि मनुवादी विचारसरणीमूळे ज्या महिलांना पुरुषांच्या पायाशी स्थान होते त्या महिला आज पुरुषांच्या बरोबरीने उभ्या राहत आहेत. भारतीय महिला आज जो मोकळा श्वास घेत आहेत तो केवळ डॉ बाबासाहेब आंबेडकरांमुळेच घेत आहेत. यासाठी भारतीय महिलांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांना प्रातः स्मरणीय आणि वंदनीय मानले पाहिजे. नोव्हेंबर १९३८ मध्ये कुटुंब नियोजना संबंधीचे विधेयक डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रयत्नांमुळेच मुंबई विधिमंडळात आले होते. त्यांनी महिलांच्या हितासाठी व कल्याणासाठी कुटुंब नियोजनाचा मार्ग दाखवला. मुलं केंव्हा पाहिजे याचे स्वातंत्र्य त्यांनी महिलांना दिले. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे भारताचे मजूर मंत्री असताना त्यांनी महिला सक्षमीकरणाचे अनेक निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली. खान कामगार महिलेला प्रसूती भत्ता, कोळसा खाणीत काम करणाऱ्या महिलांना पुरुषांइतकिच मजुरी, बहूपत्नीत्वला कायद्याने बंदी, मजूर व कष्टकरी महिलांना २१ दिवस किरकोळ रजा, एका महिन्याची हक्काची रजा, दुखापत झाल्यास नुकसान भरपाई आणि वैद्यकीय रजा, २० वर्ष सेवा करुन निवृत्त झाल्यावर मरेपर्यंत निवृत्तिवेतन असे महिलांसाठी अनेक क्रांतिकारक निर्णय त्यांनी मजूर मंत्री असताना घेतले. बाबासाहेबांनी १९४७ साली कायदा मंत्री असताना हिंदू संहिता विधेयक अर्थात हिंदू कोड बिलाचा प्रस्ताव संसदेत मांडला. हे विधेयक क्रांतिकारी होते. हिंदू वैयक्तिक कायद्यात एकाच वेळी परस्परपूरक पुरोगामी तत्वे समाविष्ट करण्याचे हे क्रांतिकारक पाऊल होते. अस्पृश्यतेचे उच्चाटन, लग्नासंबंधातील स्त्री पुरुष समानता, नवऱ्याने केलेल्या अन्याय अत्याचाराविरोधात दाद मागण्याचा अधिकार, महिलांना घटस्फोट घेण्याचा अधिकार, वारसा हक्काचा लाभ महिलांनाही देण्याची तरतूद इत्यादी तत्वे या बिलात डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी समाविष्ट केली होती. डॉ बाबासाहेबांच्या मते सामाजिक न्यायचा लढा यशस्वी होण्यासाठी हिंदू समाजाचा वैयक्तिक कायद्यामध्ये जाती व्यवस्था आणि पुरुषप्रधानता यांना नकार देऊन समान वैयक्तिक संबंधांची पायाभरणी करणे आवश्यक आहे. दुर्दैवाने या विधेयकाला संसदेत प्रचंड विरोध झाला. सुरवातीला पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरुंचा या विधेयकाला पाठींबा होता पण काँग्रेसमधील सनातनी विचाराच्या नेत्यांनी या विधेयकाला प्रखर विरोध दर्शवल्यानंतर पंडित नेहरुंनी हे विधेयक मागे घ्यावे अशी विनंती बाबासाहेबांना केली. देशाची राज्यघटना बनवताना बाबासाहेबांनी जितकी मेहनत घेतली होती तितकीच मेहनत हे विधेयक बनवताना बाबासाहेबांनी घेतली होती. त्यामुळे बाबासाहेबांना खूप वाईट वाटले. हिंदू कोड बिलाला होणारा विरोध बाबासाहेबांसाठी खूप त्रासदायक ठरला शेवटी या मुद्द्यावरुन त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. कोणतीही चळवळ महिलांशिवाय पूर्ण होऊ शकत नाही, सामाजिक क्रांती करायची असेल तर त्यात महिलांचा समावेश असावाच असे बाबासाहेबांचे मत होते म्हणूनच त्यांच्या सर्व आंदोलनात महिलांचा समावेश होता मग ते १९२७ चे चवदार तळ्याचे आंदोलन असो की १९३० च्या नाशिकमधील काळाराम मंदिरातील आंदोलन असो. १९४२ च्या नागपुरातील महिला परिषदेत महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. लग्न हे मुलीच्या प्रगतीत अडसर ठरू नये. मुलीवर लग्न लादू नये ते तिच्या संमतीनेच व्हावे. लग्नानंतर बायको ही नवऱ्याची गुलाम नको मैत्रीण बनायला हवी. पतीच्या संपत्तीत पत्नी देखील समान वाटेकरी आहे. पत्नीच्या सुरक्षेची जबाबदारी पतीची असून तिला शारीरिक किंवा मानसिक त्रास जर पतीने दिला तर त्याला कायद्याने शिक्षा व्हायला हवी असे त्यांचे मत होते. भारतीय राज्यघटना लिहिताना डॉ आंबेडकरांनी राज्यघटनेच्या कलम १४, १५, १५(३), १६(२), ३९(क), ३९(घ), ३९(ड), ४२, ३२५ इत्यादी कलमांचा अंतर्भाव करून महिलांचे हित व कल्याण जोपासण्याचा प्रयत्न केला आहे. दुर्दैवाने देशातील महिला आजही बाबासाहेबांच्या या कार्याविषयी अनभिज्ञ आहेत. बाबासाहेबांचे भारतीय स्त्रियांवर अनंत उपकार आहेत. बाबासाहेबांनी महिलांसाठी इतके करून ठेवले आहे की अनेक जन्म घेऊनही हे उपकार फिटनार नाही.





श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद

# महापुरुषांच्या विचारांचा वारसा सामाजिक कार्यातून जोपासणारे प्रा.डॉ.सुनिल मतकर

## वंचित घटकांच्या उन्नतीसाठी झटणारे, महामानवांच्या विचारांचे मानवसेवा प्रतिष्ठान



**संगमनेर । नितीनचंद्र भालेराव**

प्राचीन काळी गुरुकुल पद्धतीत गुरूचे स्थान महत्त्वाचे असे, गुरुजन शिष्यांना सर्वांगसुंदर घडविण्या सोबतच गावांना दिशा देखील द्यायचे. असाच एक अवलिया आधुनिक काळात असून त्यानेही विद्यार्थी घडविण्यासोबत गावात अमूलाग्र बदल घडवून आणला. हा अवलिया म्हणजे मोहजखुर्द या छोट्याशा गावातील शिक्षक प्रा.डॉ.सुनिल मतकर होय. मानव सेवा प्रतिष्ठान या संस्थेच्या माध्यमातून ''जगमित्र गुरुकुल''ची स्थापना करण्यात आली. आज या गुरुकुलामध्ये निवारा केंद्र,बालगृह,वृद्धाश्रम व्यायाम शाळा,व्यसनमुक्ती केंद्र, वाचनालय, लोककला जतन व संवर्धन प्रशिक्षण केंद्र असे विविध बहु उपयोग समाजकेंद्री, सामाजिक बांधिलकी जपणारे मानवतेचे मंदिर उभे केले आहे. भारतीय घटनेचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर व शिक्षण महर्षी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांनी प्रेरित होऊन त्यांच्या मार्गावर मार्गक्रमण करीत प्रा.डॉ.सुनिल मतकर यांच्या मानव सेवा प्रतिष्ठानची वाटचाल समाजाला नव प्रेरणा, आदर्श व दिशा देणारी आहे. वडील देविदास मतकर यांचे लहानपणीच आई-वडिलांचे छत्र हरपले. त्यामुळे गावातील शंकर दादा वांडेकर यांच्या कुटुंबाने त्यांचा सांभाळ केला,तसेच मोहज खुर्द या गावातील ज्येष्ठ नागरिकांचे मोठे सहकार्य मिळाले.देविदास मतकर व द्रौपद बाई यांना सुनिल,बाळासाहेब मुलगी राजकवर असे त्यांचे छोटेसे सुसंस्कारी मतकर कुटुंब होय. मोहज खुर्द,तालुका पाथर्डी, जिल्हा अहिल्यानगर या गावात पावसाचे प्रमाण कमी असल्याने रोजगाराची संधी उपलब्ध नसल्याने सुनिल मतकर यांनी रोजगार हमी योजने मध्ये काम केले.रस्त्याच्या कामात खडी टाकणे,बंधाऱ्याचे काम,ओसाड माळ रानात बांध घालणे अशा प्रकारे मोलमजुरी व मेहनतीचे कष्टाचे काम करून शिक्षण घेतले.शिक्षण घेत असताना आलेल्या अडचणी वर मात करून एम.ए.मराठी पर्यंतचे शिक्षण वसतिगृहात राहून पूर्ण केले.त्यानंतर सदुरु प्रसाद शिक्षण व संशोधन संस्था पंढरपूर संचलित श्री.संत तनपुरे बाबा विद्यालय खांडगाव,तालुका, पाथर्डी,जिल्हा अहिल्यानगर येथे गेली २५ वर्षापासून ज्ञानदानाचे कार्य करत आहे.संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प.गुरुवर्य बद्रीनाथ तनपुरे महाराज यांनी एका कार्यक्रमाप्रसंगी आपल्या भाषणामध्ये प्रा.डॉ.सुनिल मतकर यांचा ''आम्हाला एक हिरा सापडलेला आहे ''अशा शब्दात गौरव केला. प्रा.डॉ.सुनिल मतकर यांनी मानव सेवा प्रतिष्ठान या संस्थेची सन २०१२ मध्ये स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून सन २०१२ मध्ये श्रीराम बाल संस्कार केंद्र सुरू करण्यात आले. सन २०१४ मध्ये जय बजरंग व्यायाम शाळा शाळेची स्थापना करण्यात आली.मुलांना व्यायामाचे साहित्य उपलब्ध करून देण्यात आले.सन २०१५ मध्ये निवारा केंद्र बालगृहाची मान्यता महिला व बालकल्याण विभागाकडून मिळाली.या निवारागृहामध्ये ४० ते ५० मुलं निवासी स्वरूपाचा लाभ घेत आहे.सन २०१७ मध्ये प्रयोगात्मक लोककला सादरीकरणासाठी सांस्कृतिक संचालनालय महाराष्ट्र शासन पुणे यांची मान्यता मिळाली. सध्या लोककला जतन संवर्धन प्रयोगात्मक सादरीकरण कार्यक्रमांतर्गत शालेय विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून दिली जात आहे.तसेच दहावीच्या विद्यार्थ्यांना वाढीव गुणांची सवलत मिळत आहे.सन २०२० मध्ये व्यसनमुक्ती केंद्राची स्थापना.सन २०२० मध्ये वाचनालय पुस्तक पेढी (मानव सेवा सार्वजनिक वाचनालय) सुविधा विद्यार्थी व तरुणांसाठी उपलब्ध करून दिली.सदर वाचनालयाचा स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या तरुणांना आणि गावातील विद्यार्थ्यांना लाभ मिळत आहे.''जगमित्र गुरुकुलची'' स्थापना सन २०२१ मध्ये करण्यात आली.या गुरुकुलामध्ये २०० पेक्षा अधिक स्थानिक गावातील व निवारा गृहातील विद्यार्थ्यांना सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.जगमित्र गुरुकुल मध्ये दर गुरुवारी व रविवारी मुलांसाठी विविध शैक्षणिक सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येते.प्रत्येक गुरुवारी सायंकाळी सहा वाजता तसेच दर रविवारी दिवसभर जगमित्र गुरुकुल मध्ये संस्कार वर्गाचे आयोजन करण्यात येते.जगमित्र गुरुकुल मध्ये नृत्य प्रशिक्षण,हरिपाठ,वाद्य श्लोक,वकृत्व कौशल्य, व्यक्तिमत्व विकास व विविध कला क्रीडा प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. तर जगमित्र गुरुकुल मध्ये शैक्षणिक उपक्रमांसाठी सौ. अकोलकर- साठे मॅडम यांचे विशेष मार्गदर्शन सहकार्य मिळत आहे.सन २०२४-२५ मध्ये कै. मालोजी मतकर वृद्धाश्रमाची स्थापना केली.येथे २०-२५ वृद्धांना या अंतर्गत लाभ मिळत आहे.त्यामध्ये वृद्ध,जेष्ठ नागरिकांना निवासी व्यवस्था करण्यात आली आहे.सदर वृद्धाश्रमामध्ये वृद्ध व्यक्तींना राहण्यासाठी स्वतंत्र अशी निवासाची व्यवस्था केलेली आहे. पलंग,गादी,ब्लँकेट,कपडे,दोन वेळचे जेवण,चहा,नाश्ता अशाप्रकारे व्यवस्था संस्थेमार्फत करण्यात आली आहे. वृद्धाश्रमामध्ये आजारी वृद्ध व्यक्तींना डॉ.अविनाश मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली औषधोपचार केले जातात.मानव सेवा प्रतिष्ठानच्या शैक्षणिक संकुलामध्ये तथा गुरुकुल मध्ये विविध सोयी सुविधा व उपक्रमाचे आयोजन केले जाते. या गुरुकुलामध्ये प्रशस्त असे सामाजिक हॉल,कॉम्प्युटर सेंटर, कार्यालय आहे.बंदिस्त प्रेक्षा हॉल हा क्रीडा विभाग अहमदनगर यांच्याकडून मिळाला आहे. अशाप्रकारे अल्पावधीतच छोट्याशा रोपट्याचा मोठा वटवृक्ष झाला.या कामी प्रा.डॉ. सुनिल मतकर व त्यांच्या कुटुंबीयांचा मोठा सिंहाचा वाटा आहे.त्यांच्या या सामाजिक बांधिलकी जपणे,सामाजिक कार्याचा नावलौकिक मोहज खुर्द आणि पंचक्रोशीतच नव्हे तर संपूर्ण पाथर्डी तालुक्या बाहेर परराज्यात पोहोचला आहे. त्यांच्या कामाची पावती म्हणून महाराष्ट्र,गोवा,कर्नाटक या तीन राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अंतरराज्य आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. आज जगमित्र गुरुकुलचे कार्य शासनाच्या मदती विना चालू आहे.प्रा.डॉ.सुनील मतकर हे स्वतःच्या पगारातून पदरमोड करून,कर्ज काढून,वेळप्रसंगी पत्नीचे दागिने विकून अनाथ मुलांचा सांभाळ करतात,वृद्ध व्यक्तींना मदत करतात. स्वतः पुरते आयुष्य जगणाऱ्या कलयुगातील समाजाचे आत्मभान जागवून व नव प्रेरणा देणारे प्रा.डॉ.सुनील मतकर यांचे कार्य दिशादर्शक आहे.महात्मा ज्योतिराव फुले,भारतीय घटनेचे निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर व शिक्षण महर्षी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा वारसा चालविणारे प्रा. डॉ.सुनील मतकर यांना पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा.




**११ एप्रिल महात्मा ज्योतिबा फुले जयंती व अखिल भारतीय किसान सभेच्या स्थापनादिनानिमित्त शेवगाव जिल्हा अहमदनगर येथे महात्मा फुले यांच्या पुतळ्याला अभिवादन करून किसान सभेचा स्थापना दिवस साजरा करण्यात आला. यावेळी राज्य सचिव अ‍ॅड. कॉ. सुभाष लांडे, भगवान गायकवाड , संजय नांगरे, संदीप इथापे, बापूराव राशिनकर आदी.**



# सोमैया महाविद्यालयात क्रांतिसूर्य महात्मा फुले यांना अभिवादन

**कोपरगाव । किसन पवार**

के.जे. सोमैया (वरिष्ठ) व के.बी.रोहमारे (कनिष्ठ) महाविद्यालयात थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. ते एक विचारवंत व लेखक होते, त्यांनी आपले संपूर्ण जीवन शोषितांच्या शिक्षणासाठी आणि उत्थानासाठी तसेच अस्पृश्यता आणि जातिव्यवस्थेच्या निर्मूलनासाठी समर्पित केले होते. म्हणूनच त्यांना महात्मा ही उपाधी देउन गौरविण्यात आले. त्यांनी पत्नी सावित्रीबाई फुले यांच्या मदतीने पुण्यात मुलींसाठी शाळा उघडली जे भारतातील महिला शिक्षणाच्या दिशेने एक क्रांतिकारी पाऊल ठरले. शिक्षणासह त्यांनी अनेक सामाजिक कार्यही केली. शिक्षण, समता आणि सामाजिक जागृती करून लढा देणारे महात्मा ज्योतिबा फुले यांची आज जयंती असल्याने या दिनाचे औचित्य साधुन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. विजय ठाणगे, प्रा. संतोष पगारे, डॉ. बाबासाहेब गव्हाणे, डॉ. शैलेंद्र बनसोडे, प्रा. सदाशिव नागरे, डॉ. अभिजित नाईकवाडे, डॉ. निता शिंदे, प्रा. वर्षा आहेर यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयातील बहुसंख्य प्राध्यापक व विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# फुलेंच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या वास्तुंच्या ठिकाणी मनपाने चित्रप्रसंग लावावेत- वाकळे

## अहमदनगर इतिहास प्रेमीमंडळातर्फे अभिवादन



**अहमदनगर । प्रतिनिधी**

भारतातील शिक्षणक्षेत्रात अत्यंत महत्वाची कामगिरी करणारे महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीमाई फुले दाम्पत्य यांनी वेळोवेळी अहमदनगर शहरात भेट दिली, वास्तव्य केले. त्यात अहमदनगर मराठी मिशनच्या सिंधिया फरार यांच्या क्लेरा ब्रुस कन्याशाळेत सावित्रीमाई फुले व फातिमा शेख या काही दिवस शिक्षिकेचे प्राथमिक शिक्षण घेतले होते. तर काही न्यायालयीन कामकाजासाठी भाऊसाहेब फिरोदिया हायस्कुल येथिल असलेले मेन हॉल या कोर्टास भेट दिली होती. येथे त्यांचे मित्र सदाशिव विनायक गोवंडे कार्यरत होते. महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीमाई फुले दांपत्याची प्रासंगिक भितीचित्रे महापालीकेने तयार करून या दोन ठिकाणी लावावी. जेणेकरुन येणाऱ्या पिढीला फुले दाम्पत्याचे शैक्षणिक योगदान स्मरणात राहील. अशी मागणी अहमदनगर इतिहासप्रेमी मंडळाचे कार्याध्यक्ष भैरवनाथ तुकाराम वाकळे यांनी केली. महात्मा ज्योतिबा फुले जयंतीनिमित्त अहमदनगर इतिहासप्रेमी मंडळातर्फे महात्मा फुले यांच्या माळीवाडा येथील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अहमदनगर इतिहासप्रेमी मंडळाचे अध्यक्ष आसिफ दुलेखान, इंजि.अभिजित वाघ, संध्याताई मेढे, दत्ताभाऊ वडवणीकर, मखदूम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष आबीद दूल्हेखान, सय्यद शफाकत, विलास साठे, संजय कांबळे आदी उपस्थित होते.

# केंद्र सरकारने फुले दांपत्यास भारतरत्न उपाधीने सन्मानित करावे- आव्हाड

**राजेंद्र देवढे । पाथर्डी**

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले हे दांपत्य भारतातील स्त्री शिक्षणाचे प्रणेते आहे. त्यांनी केलेल्या शिक्षणक्षेत्रातील कार्यामुळे आज आपला देश आधुनिक जगात अतुलनीय कामगिरी बजावत आहे त्यांच्या कार्याचा गौरव व्हावा यासाठी केंद्र सरकारने फुले दाम्पत्यास भारतरत्न उपाधीने सन्मानित करावे अशी मागणी माजी नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी केली. क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची १९८ वी जयंती आज शहरातील संत सावता महाराज सभागृहात मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी माजी नगरसेवक बंडू पाटील बोरुडे, अनिल बोरुडे, ह.भ.प.मोहन महाराज सुडके, माजी नगरसेवक रमेश गोरे, सामाजिक कार्यकर्ते आजिनाथ डोमकावळे, राजेंद्र दुधाळ, दत्तात्रय साखरे, उद्योजक गणेश सोनटक्के, माणिक साखरे, भाऊ तुपे, लक्ष्मणराव डोमकावळे, शिरुभाऊ सोनटक्के, सुभाष भडके, रायभान सोनटक्के, लगड मामा, बाबु बोरुडे, पप्पू सोनटक्के, बंडू तुपे आदींसह मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते. यावेळी अरविंद सोनटक्के यांनी महात्मा फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकला तर बंडू पाटील बोरुडे यांनी जातीय सलोखा राखण्याचे आवाहन केले. यावेळी सोनटक्के म्हणाले की, क्रांतीसूर्य ज्योतिबा एक समाजसुधारक, विचारवंत आणि लेखक होते ज्यांनी आपले जीवन शोषितांच्या शिक्षणासाठी आणि उत्थानासाठी तसेच अस्पृश्यता आणि जातिव्यवस्थेच्या निर्मूलनासाठी समर्पित केले. फुले यांनी पुण्यात मुलींसाठी एक शाळा उघडली, जी भारतातील महिला शिक्षणाच्या दिशेने एक क्रांतिकारी पाऊल ठरले. सर्व जातींमधील लोकांना समान हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी आपल्या अनुयायांसह सत्यशोधक समाजाची स्थापना केली. महात्मा फुले यांनी रायगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी शोधून, त्यांची पहिली शिवजयंती साजरी केली. यासह त्यांनी अनेक सामाजिक कार्य केले. त्यांचे जीवन हे आदर्शवत जीवन होते. डॉ. अनिल पानखडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर बाळासाहेब सोनटक्के यांनी आभार प्रदर्शन केले.



Friends of Rayat Samachar
इंडी जर्नल वाचण्यासाठी
QR code scan करा